समरी फौजदारी केस क्र. ५५/२०१७
निशाणी क्र.२४

**<u>फिर्यादीचा उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री.डिंगणकर यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

०१. मी प्लॅट सन २०१० मध्ये विकत घेतला होता. प्लॅट हा मी माझया नावाने घेतला आहे. मी त्या प्लॅटमध्ये स्वत: रहात होते. माझे घरामध्ये मी, माझे पती,माझा मुलगा व मुलगी असे रहात होतो. माझा मुलगा सिव्हील ड्राफट्समन आहे. मुलगी लॅब टेकनिशियन आहे.

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या बिल्डींगमध्ये रहात होते तेथे माझयाप्रमाणे अनेक लोक वास्तव्यास आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरील प्लॅट भाडयाने देणेबाबत पेपरमध्ये जाहिरात दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला भाडयाने प्लॅट देत आहे याबाबत लेखी कागदपत्रे केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत प्लॅट भाडयाचा व्यवहाराचा करार केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्लॅट हा किती वर्षासाठी दयायचा आहे त्याच्या अटी याबाबत लेखी करार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जो प्लॅट भाडयाने देणार त्याचे लाईट बील पाच हजार रुपये याबाबत कागदोपत्री ठराव आरोपीशी झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्लॅट जो भाडयाने देणार होते त्याबाबत अॅडव्हान्स व महिन्याचे भाडे किती याबाबत लेखी करार आरोपीसोबत केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/०८/२०१५ रोजी मी आरोपीला प्लॅटचा ताबा दिला व त्याने तो घेतला याबाबत लेखी करार झाला नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ३१/०७/२०१६ रोजी आरोपीच्या ताब्यात प्लॅट होता असे दर्शविणारे कागदपत्रे याकामी दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी प्लॅटचे भाडे देत नाही तो प्लॅट फुकट वापरतो म्हणून त्यासंदर्भात त्यास नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने प्लॅट फुकट वापरला व नंतर सोडून गेला म्हणून त्यांचेविरुध्द कोणत्याही पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली नाही.

**<u>आरोपीतर्फे उलटतपासासाठी मुदतीचा अर्ज आला व तो मंजूर झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/—

दिनांक:—१६/०७/२०१८

न्याय दंडाधिकारी प्रथमवर्ग
**सावंतवाडी**

समरी फौजदारी केस क्र. ५५/२०१७
निशाणी क्र.२४

**<u>फिर्यादीचा पुढील उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री.डिंगणकर यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

०४. हे म्हणणे खरे आहे की,एक वर्षाचे लाईट बील अथवा पाणी बील आरोपीचे नावावर होते असा पुरावा माझेकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की,दिनांक ०१/०८/२०१५ ते ०५/०८/२०१६ या कालावधीत आरोपी हा प्लॅटमध्ये रहात होता याबाबत कागदोपत्री पुरावा दाखले केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की,दिनांक ०१/०८/२०१५ ते चेकचा पहिला तारखेचा कालावधीपर्यंत आरोपीविरुध्द तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे कौ माझया तक्रारीमध्ये कोणाच्या समक्ष चेक दिला हे नमुद नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५/११/२०१६ चा जो चेक होता तो वटला नाही म्हणून दिनांक ०७/११/२०१६ रोजी बॅकेने कळविले. हे म्हणणे खरे आहे की, दुसरा चेक हा दिनांक १३/१२/२०१६ चा होता तो वटला नाही म्हणून बॅकेने त्यादिवशी कळविले. दिनांक ०५/११/२०१६ च्या चेकची डिमांड नोटीस तारीख आता माझया लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही चेकची नोटीस दिनांक २७/१२/२०१६ रोजी पाठविली. हे म्हणणे खरे आहे की,दिनांक ०५/११/२०१६ ची वेगळी डिमांड नोटीस पाठविली नव्हती. माझया म्हणण्याप्रमाणे डिमांड नोटीसमधील पत्ता जी —३६०, उभाबाजार,सावंतवाडी मध्ये आरोपी रहात होते. सदर नोटीस दाखल करताना सदर आरोपी तेथे रहातो याची खात्री मी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, कागदोपत्री खात्री केली नव्हती. साक्षीदाराने सांगितले की, आरोपी तेथे रहातो हे मला माहित होते

०६. माझया मुलाची व आरोपीची मैत्री कॉलेजपासून होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची व माझया मुलाची मैत्री असल्याने त्याला मी प्लॅट भाडयाने दिला होता जो त्याने एक वर्ष वापरला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ओळखीमुळे सदर घर आरोपीला भाडयाने दिले व भाडे रु.५,०००/— ठरले व त्यात तो भाडयाने राहिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडे प्लॅटचा ताबा दिनांक ३१/०७/२०१६ पर्यंत होता व त्याच्याशी असलेल्या चांगल्या संबंधामुळे मी भाडे मागितले नाही हे मी खोटे सांगत आहे.

०७. हे म्हणणे खरे नाही की, प्लॅटच्या भाडयासंदर्भात सदरचे धनादेश दिले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला ज्या पत्यावर नोटीस पाठविली त्यावेळी आरोपी तेथे कधी रहात नव्हता. हे मला माहित नाही की,आरोपीने सदरचे दोन्ही

धनादेश गहाळ झाल्याबाबत दिनांक ०३/१२/२०१६ रोजी स्टेट बॅकेत तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मुलाचे ओळखीमुळे त्याला घर भाडयाने दिले होते व त्यामध्ये तो वास्तव्यास होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीत नमुद मजकूर व सरतपासातील मजकूर खोटा आहे व मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा कधीही माझया प्लॅटचा भाडेकरु नव्हता व त्यामुळे त्याने मला धनादेश देणेचा प्रश्नच येत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/—

दिनांकः—१३/०८/२०१८

न्याय दंडाधिकारी प्रथमवर्ग
**सावंतवाडी**